# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड

## Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२०४१३, २२६९४१७२, २२६९६९१९, २२६९४०४१

Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

**सभासद बंधू भगिनींनो,**

आपणांस कळविण्यात येते की, मंगळवार दि. २० जून २०२३ रोजी संपन्न झालेल्या सोसायटीच्या संचालक मंडळाच्या सभेत सर्वानुमते मंजूर केलेल्या ठरावानुसार मुदतठेवीवरील व्याज दरात वाढ करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे त्याची अंमलबजावणी दि. ०१ जुलै २०२३ पासून करण्यात येईल.

१. मुदतठेवीवरील व्याज दर २४ महिन्यांसाठी द.सा.द.शे. **८.२५%**

अ. मुदत ठेवीचा कालावधी २४ महिन्यांचा असेल.

ब. मुदत ठेव योजनेत रक्कम गुंतविल्यानंतर १२ महिन्याच्या आत रक्कम परत घेतल्यास द.सा.द.शे. **४.००%** दराने व्याज देण्यात येईल.

क. १३ व्या महिन्यानंतर मुदत ठेवीची मुदत पूर्ण व्हावयाच्या आधी रक्कम परत घेतल्यास द.सा.द.शे. **६.००%** दराने व्याज देण्यात येईल.

ड. मुदत ठेवीचा २४ महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर नंतरच्या कालावधीसाठी व त्यापुढील कालावधीसाठी द.सा.द.शे. **८.२५%** दराने व्याज देण्यात येईल.

ई. मुदत ठेवीसाठी असलेली २४ महिन्याची मुदत पूर्ण झाल्यानंतर सदर मुदत ठेवीचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता नाही. सदर मुदतठेवी स्वयं नुतनीकरण सोसायटीमार्फत करण्यात येईल.

२. सोसायटीचे कार्यालय मुंबई जी.पी.ओ. नवीन इमारत, पहिला मजला येथे उपहारगृहाच्या शेजारी काही कालावधी साठी स्थलांतरीत झाले असल्यामुळे सोसायटीच्या कामकाजाच्या वेळेत खालील प्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **सोमवार ते शुक्रवार** | : सकाळी ९.३० | ते | सायंकाळी | ६.०० | वाजे पर्यंत |
| **शनिवार** | : सकाळी ९.३० | ते | दुपारी | ३.०० | वाजे पर्यंत |

**आर्थिक व्यवहाराच्या वेळा**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **सोमवार ते शुक्रवार** | : सकाळी ९.३० | ते | सायंकाळी | ४.०० | वाजे पर्यंत |
| **शनिवार** | : सकाळी ९.३० | ते | दुपारी | १.३० | वाजे पर्यंत |

आपला सहकारी
**महेश डी. सावंत**
मानद सचिव
संचालक मंडळाच्या वतीने